असा. क्र. ५५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६–०८.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, डिसेंबर १३, २००६/अग्रहायण २२, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

दिनांक १३ डिसेंबर, २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १३ डिसेंबर, २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९६५ चा महा. ४०.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



शामुना—एचबी–२०९६-चार-८४.

[**किंमत** : रुपये ९.००]

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५१ मध्ये,— १९६५ चा महा. ४०.

(क) पोट-कलम (७) मध्ये,—

" परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी " या मजकुराऐवजी, " उपाध्यक्षाची निवड करण्यासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (८) वगळण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१ अ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ५१ अ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, " कलम ५१ च्या पोट-कलम (९) अन्वये बोलाविण्यात आलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये " या मजकुराऐवजी, " कलम ५१ च्या पोट-कलम (२) अन्वये बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " अध्यक्षस्थान स्वीकारील आणि जर अध्यक्ष नसेल तर " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मध्ये " अध्यक्षाकडून किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ५१ ब समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ५१ अ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

परिषद सदस्यांचे नामनिर्देशन.

"**५१ ब.** (१) जिल्हाधिकारी, अध्यक्ष, निवडून आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्याच्या प्रयोजनासाठी एक विशेष सभा बोलावील.

(२) कलम ९, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये करावयाचे परिषद सदस्यांचे नामनिर्देशन, विहित रीतीने करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी याबाबत लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा, त्याला नगर परिषदेच्या अध्यक्षाला नगरपरिषदेच्या सभेच्या अध्यक्षपदी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही :

परंतु, सभेतील कार्यपद्धतीचे (सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीसह) विनियमन करण्यासाठी या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी अशा सभेच्या अध्यक्षपदी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणांवरून, अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल."

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६३ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये,—

(एक) पोट-कलम (२) मध्ये, खंड (ब) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ब) पोट-कलम (२ब) च्या तरतुदींनुसार विषय समित्यांवर परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी :";

(दोन) पोट-कलमे (२ब), (३), (३अ) आणि (३ब) यांऐवजी पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(२ब) परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करताना, जिल्हाधिकारी, मान्यताप्राप्त पक्षांचे अगर नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि अशा प्रत्येक पक्षाच्या किंवा गटाच्या नेत्याशी विचारविनिमय करून, शक्यतोवर, परिषदेमधील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, तिच्यामुळे अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसणाऱ्या कोणत्याही सदस्याचे समितीवर नामनिर्देशन करण्यास जिल्हाधिकाऱ्याला प्रतिबंध होतो असा अर्थ लावला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी (२ ब) च्या अंतर्गत पक्ष किंवा गटांच्या संख्या बळाचा निर्णय करतांना निवडणूक निकालाच्या अधिसूचनेनंतर एक महिन्यापेक्षा अधिक नाही अशा कालावधीत विविध पक्ष, गट अथवा या दोन्हीचे सदस्य नसलेले निर्वाचित सदस्य यांना एकत्रित येऊन आघाडी तयार करता येईल व अशा आघाडीची नोंदणी झाल्यावर तिला निवडणूकपूर्व नोंदणीकृत आघाडीचे सर्व अधिकार त्याचप्रमाणे नोंदणीकृत पक्ष अथवा गटाच्या सदस्यांना लागू असलेल्या निर्हता याबाबतच्या उक्त अधिनियमातील तरतूदी यथास्थिती लागू असतील."

(२क) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.".

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ६४ मध्ये,—

(एक) "निवडून दिलेले" आणि "निवडून आलेले" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल तेथे, "नामनिर्देशित केलेले" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) "निवडणुकीसाठी" या मजकुराऐवजी "नामनिर्देशनासाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६४ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ६५, पोट-कलम (४) मधील, खंड (क) मध्ये, "त्यांच्या निवडणुका घेण्यासाठी" या मजकुराऐवजी, "त्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६५ ची सुधारणा.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६६ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ६६ मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल,—

"(क) कलम ६३, पोट-कलम (२ब) मध्ये, निर्धारित केलेल्या रीतीने जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेले असे इतर सदस्य; तथापि, स्थायी समितीच्या सदस्यांची एकूण संख्या, उक्त कलमाच्या पोट-कलम (४), खंड (अ) अन्वये निर्धारित केलेल्या संख्येपेक्षा अधिक होता कामा नये :

परंतु, कोणत्याही पालिका सदस्याला एकापेक्षा अधिक विषय समित्यांचा सदस्य म्हणून आधीच नामनिर्देशित करण्यात आले असेल तर, तो स्थायी समितीचा सदस्य होण्यास पात्र असणार नाही.".

शासकीय मुद्रणालय, नागपूर